# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक-२५४/२०२४ दिनांक- ०४/०७/२०२४

## पोलीस भरती लेखी परीक्षा

सन २०२२-२०२३ पोलीस शिपाई भरतीमधील खालील नमूद घटकांची शारीरीक चाचणी संपन्न झाली आहे. सदर घटकांमध्ये शारीरीक चाचणीमध्ये उत्तीर्ण होवून लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी १:१० प्रमाणातील उमेदवारांची यादी संबंधित आयुक्तालय/जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आलेली आहे. यादीतील नमूद उमेदवारांची लेखी परीक्षा ही दिनांक ०७.०७.२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | घटकाचे नाव | अ.क्र | घटकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार | १२. | पोलीस अधीक्षक, धुळे |
| २. | पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर शहर | १३. | पोलीस अधीक्षक, जळगांव |
| ३. | पोलीस आयुक्त, नवी मुंबई | १४. | पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण |
| ४. | पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | १५. | पोलीस अधीक्षक, बीड |
| ५. | पोलीस आयुक्त, नाशिक शहर | १६. | पोलीस अधीक्षक, जालना |
| ६. | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | १७. | पोलीस अधीक्षक, यवतमाळ |
| ७. | पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई | १८. | पोलीस अधीक्षक, लातूर |
| ८. | पोलीस अधीक्षक, पालघर | १९. | पोलीस अधीक्षक, वाशीम |
| ९. | पोलीस अधीक्षक, सांगली | २०. | पोलीस अधीक्षक, भंडारा |
| १०. | पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण | २१. | पोलीस अधीक्षक, वर्धा |
| ११. | पोलीस अधीक्षक, अहमदनगर | २२. | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे |

उपरोक्त नमुद घटकांतील पोलीस शिपाई भरतीमध्ये शारीरीक चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधित जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आलेल्या यादीमध्ये लेखी परीक्षेसाठी त्यांचे नावाची खातरजमा करावी व त्यांचे नावाचा समावेश असल्यास त्यांनी महाआयटीचे **https://policerecruitment2024.mahait.org** या संकेतस्थळावर जावून हॉलतिकीट डाऊनलोड करुन घ्यावे व लेखी परीक्षेस विहित वेळेत नेमून दिलेल्या केंद्रावर उपस्थित रहावे.